**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** रत्नागिरी **P.S.(ठाणे):** रत्नागिरी शहर **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0064 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 05/02/2019 06:32 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 04/02/2019
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 04/02/2019
**Time From (वेळेपासून):** 18:31 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:31 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 05/02/2019 **Time (वेळ):** 06:10 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 016 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/02/2019 06:10 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 01 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** रत्नागिरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अमर अर्जुन खोत 7028185219

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**

(c) **Date/Year of Birth (जन्म** 1989 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

फिर्यादी जबाब दिनांक ०५/०२/२०१९

मी अमर अर्जुन खोत, वय-३० वर्षे, व्यवसाय-व्यापार, रा. मु.पो.कसबा ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी, मुळ रा. मु. पो. शिरटे, ता. वाळवा, जि. सांगली मो. नं. ७०२८१८५२१९, ९९२१९४५२१९ फिर्याद लिहून देतो की,

मी वरीलप्रमाणे रहाणार असून, माझे तुपारी ता. पलूस जि. सांगली येथे शेतीयंत्राचे शोरुम आहे. मी रत्नागिरी जिल्हयामध्ये विविध ठिकाणी शेतीयंत्राचा पुरवठा करतो. माझे वडील अर्जून लक्ष्मण खोत हे कसबा हायस्कूल ता. संगमेश्वर येथे शिक्षक म्हणून नोकरीस होते ते चार वर्षापूर्वी सेवानिवृत्त झाले आहेत. माझी आई सौ. सुलभा अर्जुन खोत ही कसबा हायस्कूल ता. संगमेश्वर येथे शिक्षिका म्हणुन नोकरीस आहे.

माझ्या वडीलांचे माहे जुलै २०१८ मध्ये श्री सिध्दीविनायक हार्ट हॉस्पीटल कोल्हापूर येथे पेसमेकर बसविण्याचे ऑपरेशन झाले होते. ऑपरेशन करीता रुपये २,६४,०७१/- इतका खर्च आलेला होता. झालेल्या ऑपरेशनचे मेडीकल बील नियमानुसार आईच्या शाळेच्या माध्यमातुन मंजूर करावयाचे होते. त्यासाठी सिव्हील सर्जन रत्नागिरी यांच्या मंजूरी व सहीची आवश्यकता होती. म्हणून मी दिनांक ०२/०२/२०१९ रोजी वडीलांचे मेडीकल रिपोर्ट व फाईल घेवून जिल्हा शासकीय रुग्णालय रत्नागिरी येथे जावून तेथील क्लार्क श्री. अनंत कदम यांची भेट घेतली व त्यांना बीलाची सर्व कागदपत्रे दाखविली. त्यावेळी क्लार्क अनंत कदम यांनी माझ्या वडीलांच्या झालेल्या ऑपरेशनचे रुपये २,६४,०७१/- एवढे बील मंजूर व सही करण्यासाठी डॉ. प्रल्हाद नारायण देवकर, सिव्हील सर्जन रत्नागिरी यांना १० टक्के रक्कम आणि कार्यालयाची शासकीय ३ टक्के रक्कमेची वेगळी पावती फाडावी लागेल अशी एकूण १३ टक्के रक्कम दयावी लागेल असे मला सांगितले. त्यावेळी मी क्लार्क अनंत कदम यांना डॉ. देवकर यांची भेट करुन देण्याची विनंती केली असता ते मला डॉ. प्रल्हाद नारायण देवकर, जिल्हा शल्य चिकित्सक रत्नागिरी यांच्या केबीनमध्ये घेवून गेले. त्यावेळी डॉ. देवकर मला म्हणाले की, त्या क्लार्कना भेटा आणि ते म्हणतील तस करा. नंतर मी व क्लार्क कदम केबीनचे बाहेर आलो. त्यावेळी क्लार्क कदम यांनी डॉ. देवकर यांचे १० टक्के रक्कम म्हणजे रुपये २७,०००/- व ३ टक्के पावतीचे म्हणजे रुपये ८०००/- असे दयावे लागतील असे सांगितले. मी क्लार्क कदम यांना रक्कम कमी करण्याची विनंती केली. तेव्हा क्लार्क कदम हे पुन्हा डॉ. देवकर यांचे केबीनमध्ये जावुन बाहेर आले व त्यांनी बीलाचे एकुण रक्कमेच्या १० टक्के रक्कम घेवून त्यामधुन कार्यालयाची शासकीय रक्कम ३ टक्केची पावती मॅनेज करतो असे डॉ. देवकर यांनी सांगितले आहे असा मला निरोप सांगितला. डॉ. देवकर व क्लार्क कदम यांचेसोबत माझी वरील प्रमाणे भेट झाली त्यावेळी मी माझे मोबाईलवर व्हिडीओ चित्रीकरण केले आहे.

डॉ. प्रल्हाद देवकर, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा शासकीय रुग्णालय रत्नागिरी व तेथील क्लार्क श्री. अनंत कदम यांनी माझे वडीलांचे मेडीकल बील मंजूर करण्यासाठी मागीतलेली १० टक्के रक्कमेमधील कार्यालयाची शासकीय ३ टक्केची रक्कम वजा करुन उरलेली रक्कम १८९००/- रुपये ही लाच रक्कम म्हणून मागत असल्याची माझी खात्री झाली. त्यांचेशी माझा कोणताही वैरवाद अथवा आर्थिक देवाण घेवाण नाही. डॉ. देवकर व क्लार्क कदम यांना लाच देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दिनांक ०४/०२/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी येथे तक्रार देण्यासाठी आलो व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी येथील पोलीस उपअधीक्षक श्री. रानमाळे यांना भेटून त्यांच्या सूचनेप्रमाणे पोलीस निरीक्षक श्री. प्रविण कदम यांचेकडे तक्रार अर्ज दिला. माझ्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. ०४/०२/२०१९ रोजी पोनि कदम यांनी माझी त्यांचे कार्यालयातील स्टाफची व तेथे उपस्थित झालेल्या दोन पंचाची ओळख करून देऊन पंचाना माझी तक्रार थोडक्यात समजावुन सांगितली. तसेच

रत्नागिरी शहर पोलीस ठाणे गु.र.नंबर ६४/२०१९ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७,१२ स्टे.डा.नं ३६/२०१९ इन्ट्री ९६ ०६.१०
(स्वा.अ.कदम पो.ना/३६०)
**पोलीस ठाणे अंमलदार**
रत्नागिरी शहर पोलीस ठाणे
जि.रत्नागिरी,राज्य-महाराष्ट्र
फोन-(०२३५२) २२२३३३

समक्ष
५/२/१९
( प्रविण कदम )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी

5.2.19
(Amar Khot)

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मु पो कसबा,संगमेश्वर,रत्नागिरी,रत्नागिरी शहर,रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मुपो शिरटे ,ता वाळवा,जि सांगली,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9921945219

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रसाद प्रल्हाद नारायण देवकर | | | 1. जिल्हाशल्यचिकीत्सक,जिल्हाशासकीय रुग्णालय रत्नागिर,रत्नागिरी शहर, रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | अनंत शिवराम कदम | | | 1. क्लार्क जिल्हाशासकीय ,रुग्णालय रत्नागिरी,रत्नागिरी शहर,रत्नागिरी, महाराष्ट्र,भारत |
| 3 | अजित गणपत नरोटे | | | 1. ड्रायव्हर जिल्हाशासकीय,रुग्णालय रत्नागिरी ,रत्नागिरी शहर,रत्नागिरी, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

हकिगत यातील आरोपीत 1 प्रल्हाद नारायण देवकर जिल्हाशल्यचिकीत्सक ,जिल्हाशासकीय रुग्णालय रत्नागिरी 2)अनंत शिवराम कदम क्लार्क जिल्हाशासकीय रुग्णालय रत्नागिरी यांनी फिर्यादी यांच्या वडीलांच्या झालेला ऑपरेशनचे बील मंजुर व सही करुन देण्यासाठी शासकीय फी व्यतिरीक्त 27,000 /- रुपये लाचेची मागणी केली त्यानंतर तडजोडी अंती आरोपीत नं 1 श्री प्रल्हाद नारायण देवकर यांनी फिर्यादी यांच्याकडे 22,000 /- रुपये लाचेची मागणी करुन ती रक्कम त्यांनी दिनांक 04/02/2019 रोजी 18.31 वा.चे सुमारास जिल्हा शासकीयरुग्णालय रत्नागिरी येथील जिल्हाशल्यचिकीत्सक यांचे केबीन मध्ये पंचासमक्ष स्वतः शिफारुन त्यातील 7000/- रुपये रक्कम बीलाच्या पावतीची शासकीय रक्कम भरण्यासाठी मला परत दिले व प्रत्यक्ष 15000 /- रुपये लाच रक्कम स्वतःचे फायद्याकरीता कायदेशीर परिश्रमाखेरीज पारितोषण म्हणुन स्विकारली तसेच आरोपित नं 3 श्री अजित गणपत नरोटे ड्रायव्हर जिल्हाशासकीय रुग्णालय रत्नागिरी यांनी आरोपित नं 1 प्रल्हाद नारायण देवकर यांना 22000/- रुपये लाच रक्कम देण्यासाठी प्रोत्साहन दिले म्हणुन माझी त्यांच्या विरुध्द तक्रार आहे म्हणुन फिर्यादी यांनी दिले फिर्यादी वरून सदरचा गुन्हा रजि. दाखल करण्यात आलेला आहे.सदर गुन्ह्याचा जाहीर रिपोर्ट मा.हुजुर कोर्टात रवाना केला. गुन्ह्याची हकिगत वरिष्ठांना कळवुन बिनतारी संदेश वरिष्ठांना पाठविला. तरी सदर गुन्ह्याचा पुढील तपास हे पोनि श्री प्रविण कदम एसीबी रत्नागिरी हे करीत आहेत.

पंचांनी माझा तक्रार अर्ज वाचुन स्वतःच्या स्वाक्षऱ्या करून त्यावर पो.नि. कदम यांनी समक्ष म्हणुन स्वतःची स्वाक्षरी केली.

त्यानंतर दिनांक ०४/०२/२०१९ रोजी मला पोलीस निरीक्षक कदम यांनी डॉ. देवकर व क्लार्क कदम यांची समक्ष भेट घेवुन त्यांनी मागीतलेल्या लाच रक्कमेबाबत बोलणी करणेकरीता डीजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन माझे अंगावरील शर्टचे आंत बनीयनला लावुन शासकीय रुग्णालय रत्नागिरी येथे पंच श्री. जाधव यांचेसह पाठविले असता क्लार्क कदम कार्यालयात हजर नव्हते. म्हणुन मी डॉ. देवकर यांच्या केबीन जवळ गेलो. त्यावेळी तेथे हजर असणारे ड्रायव्हर श्री. नरोटे यांनी डॉ. देवकर यांची त्यांच्या केबीनमध्ये मला नेवुन डॉ. देवकर यांचेशी माझी भेट घालून दिली. पंच जाधव हे माझे सोबतच होते. त्यावेळी मी सोबत नेलेली माझ्या वडीलांच्या मेडीकल बीलाची फाईल त्यांना दाखविली असता डॉ. देवकर यांनी बीलाची एकुण रक्कम किती आहे असे विचारले असता, मी २,६४,०७१/- रुपये एवढी रक्कम असल्याचे त्यांना सांगितले. त्यावेळी डॉ. देवकर यांनी एकुण २२,०००/- रुपयामध्ये सर्व बील मंजूर करुन देतो असे सांगितले. तसेच डॉ. देवकर यांनी पैसे घेवुन आला आहेस का असे मला विचारले. त्यावेळी मी त्यांना आता आणले नाहीत, आणतो लगेच असे सांगितले. त्यावेळी डॉ. देवकर यांनी घेवुन या पटकन असे मला सांगितले. त्यानंतर मी केबीन बाहेर निघताना ड्रायव्हर नरोटे यांनी मला २२,०००/- रुपये डॉ. देवकर यांना दयावे लागतील व ७०००/- रुपयांची शासकीय पावतीची रक्कम वेगळी भरावी लागेल असे मला म्हणाले. त्यावेळी मी त्यांना डॉ. देवकर यांनी सर्व मिळुन २२,०००/- रुपये मागितले आहेत असे सांगितले. त्यावेळी ड्रायव्हर नरोटे हे ठिक आहे पैसे लवकर घेवुन या, आल्यावरती बघु असे मला म्हणाले. डॉ. देवकर व ड्रायव्हर नरोटे यांचेसोबत माझी वरील प्रमाणे भेट झाली त्यावेळी मी माझे मोबाईलवर व्हिडीओ चित्रीकरण केले आहे.

त्यानंतर मी पंचासह लाचलुचपत प्रतिबंधक रत्नागिरी कार्यालयात परत आल्यावर पोलीस निरीक्षक कदम यांनी माझेकडील डीजीटल व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केला. त्यानंतर त्यांना मी वरीलप्रमाणे घडलेली हकीगत सांगितल्यावर त्यांनी डीजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन त्यातील संभाषण ऐकले. त्यामध्ये डॉ. देवकर यांनी माझ्या वडीलांचे मेडीकल बील मंजूर करण्यासाठी माझ्याकडे २२,०००/- रुपये लाच रक्कमेची मागणी केल्याचे व त्यांचे ड्रायव्हर नरोटे हे त्यांस प्रोत्साहन देत असल्याचे स्पष्ट झाले. त्यावरुन पोलीस निरीक्षक कदम यांनी सापळा आयोजित करणार असल्याचे मला व पंचाना सांगितले.

पोलीस निरीक्षक कदम यांचे सुचनेवरुन मी माझे बचतीमधील रक्कम २२,०००/- रुपये (त्यामध्ये २०००/- रुपये दराच्या ११ नोटा) लाच म्हणुन देण्यासाठी हजर केली. त्यावेळी पोलीस निरीक्षक कदम यांनी मला व पंचाना ॲन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले. त्यानंतर मी हजर केलेल्या नोटाला ॲन्थ्रासीन पावडर लावून, त्या नोटांची घडी करुन पोलीस निरीक्षक कदम यांच्या सूचनेवरुन कार्यालयातील पोलीस हवालदार ओगले यांनी माझ्या शर्टच्या पुढील डाव्या बाजूच्या खिश्यात ठेवल्या. त्यावेळी पोलीस निरीक्षक कदम यांनी मला लोकसेवक डॉ. देवकर किंवा ड्रायव्हर नरोटे हे जोपर्यंत लाचेची रक्कम मागत नाही तोपर्यंत नोटाला हात न लावण्याची सूचना दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक कदम यांच्या सूचनेवरुन मी व पंच जाधव असे लोकसेवक डॉ. देवकर यांना भेटण्यासाठी जिल्हा शासकीय रुग्णालय रत्नागिरी येथे निघालो. आमचे मागोमाग पंच नं २ चाकोते, सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी येऊन त्यांनी जिल्हा शासकीय रुग्णालय रत्नागिरी परिसरात सापळा लावण्यात आला. मी व पंच जाधव असे डॉ. देवकर यांच्या केबीनजवळ जावुन बाहेर थांबुन होतो. काही वेळानंतर त्यांचे ड्रायव्हर नरोटे हे कार्यालयातुन बाहेर येवुन लांबुन त्यांनी मला पैसे आणले का असे विचारले असता मी त्यांना हो आणले आहेत असे बोललो. त्यानंतर ते जवळ आल्यावर त्यांनी माझ्या वडीलांच्या

समक्ष

(signature) 5/2/19.

( प्रविण कदम )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी

(signature)
5.2.19
(Amar Khot)

**13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or**

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे Kishor Sadashiv **Rank** (पद): I (Inspector)

**No.**(क्र.): KSSM7601 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
रत्नागिरी शहर पोलीस ठाणे
जि.रत्नागिरी,राज्य-महाराष्ट्र
फोन-(०२३५२) २२२३३३

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): HEMANT KUMAR SHAH

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PBMH74883

मेडीकल बीलाची फाईल कार्यालयातील आवक जावक लिपिक यांचेकडे जमा करणेस सांगितली. म्हणुन मी त्यांचेसोबत कार्यालयात गेलो व त्यांनी तेथे असलेले आवक जावक लिपिक यांना माझी फाईल जमा करुन घेवुन मला पोहच देण्यास सांगितली. त्याप्रमाणे मी माझ्या वडीलांच्या मेडीकल बीलाची फाईल कार्यालयातील आवक जावक लिपिक यांचेकडे जमा करुन त्यांची पोहच घेतली. काहीवेळानंतर केबीनमध्ये असलेली सर्व माणसे बाहेर आल्यानंतर नरोटे यांनी मला डॉ. देवकर यांच्या केबीनमध्ये जाण्यास सांगितले. म्हणुन मी पंच जाधव यांचेसह डॉ. देवकर यांचे केबीनमध्ये जावुन त्यांची भेट घेतली. त्यावेळी मी फाईल इन्वर्डला जमा केली आहे असे डॉ. देवकर यांना सांगुन त्याची पोहच त्यांना दाखविली व उदया मिळेल का पण असे त्यांना विचारले. त्यावेळी डॉ. देवकर यांनी हो करुया असे बोलले. मी पैशाबाबत त्यांना विचारले असता, त्यांनी देवुन टाका ना असे मला सांगीतले. त्यावेळी मी बावीस हजारच ना असे म्हणालो व मी माझे शर्टचे पुढील डाव्या बाजुचे खिशात ठेवलेली लाचेची रक्कम २२,०००/- रुपये काढुन त्यांचेसमोर धरली असता, ती त्यांनी त्यांचे उजवे हाताने स्विकारुन दोन्ही हाताने मोजुन पाहीली व आपले समोरील टेबलावर ठेवली. त्यावेळी डॉ. देवकर हे त्याच्यात ३ टक्के हायत ना त्यात, १५ प्लस ७ मीच सांगीतल होते असे म्हणाले. त्यानंतर त्यांनी आपले पॅन्टचे मागील उजवे बाजुच्या खिशातुन पॉकेट बाहेर काढुन त्यातील ५००/- रुपये दराच्या दोन नोटा बाहेर काढल्या व त्या दोन नोटांसह टेबलावर ठेवलेल्या २२,०००/- रुपये लाचेच्या रक्कमेतील २०००/- रुपये दराच्या ३ नोटा उचलुन एकुण ७०००/- रुपये डॉ. देवकर यांनी मला परत दिले आणि ते पैसे ऑफिसमध्ये भरुन त्याची पावती घ्या असे मला सांगीतले. टेबला वरील उर्वरीत रक्कम १६,०००/- रुपये (त्यामध्ये २०००/- रुपये दराच्या ८ नोटा) त्यांनी त्यांच्या पॉकेटमध्ये ठेवुन ते पॉकेट त्यांनी त्यांच्या पॅन्टच्या मागील उजव्या बाजुच्या खिशात ठेवले. त्यानंतर मी माझ्या वडीलांचे मेडीकल बीलाचे फाईलबाबत विचारणा केली असता त्यांनी ती उदया लगेच एका दिवसात मंजुर करुन देतो असे म्हणाले. त्यांनतर मी केबीनचे बाहेर येवुन सापळा पथकास पुर्वनियोजित इशारा केल्यावर लागलीच सापळा पथकाने १) श्री. प्रल्हाद नारायण देवकर, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा शासकीय रुग्णालय रत्नागिरी व २) श्री. अजित गणपत नरोटे, ड्रायव्हर, जिल्हा शासकीय रुग्णालय रत्नागिरी यांना दि. ०४/०२/२०१९ रोजी १८.३१ वाजता ताब्यात घेतले.

तरी १) श्री. प्रल्हाद नारायण देवकर, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा शासकीय रुग्णालय रत्नागिरी २) श्री. अनंत शिवराम कदम, क्लार्क, जिल्हा शासकीय रुग्णालय रत्नागिरी यांनी माझ्या वडीलांच्या झालेल्या ऑपरेशनचे बील मंजूर व सही करुन देण्यासाठी शासकीय फी व्यतिरिक्त २७,०००/-रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर तडजोडी अंती श्री. प्रल्हाद नारायण देवकर यांनी माझेकडे २२,०००/- रुपये लाचेची मागणी करुन, ती रक्कम त्यांनी दिनांक ०४/०२/२०१९ रोजी १८.३१ वाजताचे सुमारास जिल्हा शासकीय रुग्णालय रत्नागिरी येथील जिल्हा शल्य चिकित्सक यांचे केबीनमध्ये पंचासमक्ष स्वतः स्विकारुन, त्यातील ७,०००/- रुपये रक्कम बीलाच्या पावतीची शासकीय रक्कम भरण्यासाठी मला परत दिली व प्रत्यक्ष १५,०००/- रुपये लाच रक्कम स्वतःचे फायदयाकरीता कायदेशीर परिश्रमाखेरीज पारितोषण म्हणून स्विकारली. तसेच ३) श्री. अजित गणपत नरोटे, ड्रायव्हर, जिल्हा शासकीय रुग्णालय रत्नागिरी यांनी श्री. प्रल्हाद नारायण देवकर यांना २२,०००/- रुपये लाच रक्कम देण्यासाठी प्रोत्साहन दिले म्हणून माझी त्यांचेविरुध्द तक्रार आहे.

माझा फिर्यादी जबाब मराठीत संगणकावर टंकलिखित केला असून तो मी वाचून पाहिला असता तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

हे लिहुन दिले

समक्ष
[signature] /०२/२०१९
( प्रविण कदम )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी

[signature]
5.2.19
(Amar Khot)